# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 17 February 2026

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

भारत–फ्रान्स नवोन्मेष वर्ष २०२६ या कार्यक्रमाचं आज मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉं यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मॅक्रॉं यांचं तीन दिवसांच्या भारत भेटीसाठी काल मुंबईत आगमन झालं. दोन्ही नेत्यांची आज मुंबईत लोकभवन इथं भेट होणार आहे. उभय देशातल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा ते यावेळी घेतील. दोन्ही देशांतील आघाडीचे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक आणि नवोन्मेषक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

****

देशातल्या पहिल्या ए आय लिव्हिंग लॅब चा काल मुंबईत रतन टाटा कौशल्य विद्यापीठात शुभारंभ करण्यात आला. स्वदेशी उद्योगांना तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने भारत विश्वगुरू होईल, असा विश्वास कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केला. जर्मनीच्या सहकार्यानं आणि रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. जर्मनीच्या संसदीय राज्यमंत्री डॉ. बार्बेल कॉफ्लर, रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास साध्य होऊ शकतो, असा आशावाद राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला. नवी दिल्लीत सुरु असलेल्या एआय इम्पॅक्ट परिषदेत "एआय आणि आर्थिक शक्ती – महिला नेतृत्वातील समृद्धीची रूपरेषा" या विषयावर आयोजित विशेष सत्रात त्या काल बोलत होत्या. एआय केवळ तांत्रिक साधन नाही, तर शिक्षण, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राचा केंद्रबिंदू

असून, यामुळे रोजगाराच्या संधी आणि स्वरूपात मोठे बदल अपेक्षित असल्याचं रहाटकर म्हणाल्या. महिलांनी केवळ वापरकर्त्या न राहता संशोधक आणि निर्माते बनावं, नव्या तंत्रज्ञानातील परिवर्तनाचं नेतृत्व महिलांनी करावं, असं आवाहन करत त्यांनी, एआय सारख्या नव्या तंत्रज्ञान क्षेत्रातही महिला मागे राहणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला.

****

अनिवार्य खेळणी गुणवत्ता नियंत्रण आदेश आणि भारतीय मानक ब्युरोच्या मानकांचं उल्लंघन केल्याप्रकरणी स्नॅपडील या कंपनीला सीसीपीए अर्थात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं पाच लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. स्नॅपडीलनं भारतीय मानक ब्युरोच्या मानकांचं पालन न करणाऱ्या खेळण्याची विक्री केली, तसंच ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसारित केल्या, असं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

****

चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या घरावर गोळीबार केल्या प्रकरणी सात जणांना काल विशेष न्यायालयाने २५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. १ फेब्रुवारी रोजी हा गोळीबार झाला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या पथकाने हरयाणा आणि राजस्थानमधून सात जणांना अटक केली. यात मुख्य आरोपी दीपक शर्मा याचाही समावेश आहे. या प्रकरणातला मुख्य आरोपी असलेला शुभम लोणकर हा लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य अद्याप फरार आहे. या सर्व आरोपींविरुद्ध मकोका कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

****

जालना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या वतीने शहरातल्या मोती तलाव इथं जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन शोध आणि बचाव साहित्य हाताळणी प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. यावेळी विविध विभागातल्या कर्मचाऱ्यांना आधुनिक शोध आणि बचाव साहित्याच्या हाताळणीचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आलं.

****

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा सेक्रेटरी पदी विधीज्ञ अभय टाकसाळ तर सहसचिव पदी सय्यद अनिस यांची निवड झाली आहे. काल झालेल्या बैठकीत या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आलं. भाकपच्या शतकपूर्ती

निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याचाही निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शिवकालीन लढाऊ जहाजांच्या प्रतिकृतींवर आधारित दर्यापती शिवराय मराठा आरमार युद्धनौका प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. क्रांती चौक आयोजित या प्रदर्शनाचं आज उद्घाटन होत आहे. जास्तीत जास्त शिव प्रेमींनी लाभ घेण्याचं आवाहन आयोजकांकडून करण्यात आलं आहे.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल श्रीलंकेनं ऑस्ट्रेलियाचा पराभव करत सुपर आठ मध्ये प्रवेश केला. अन्य सामन्यांमध्ये इंग्लंडने इटलीचा २४ धावांनी, तर अफगाणिस्तानने संयुक्त अरब अमिरातीचा पाच गडी राखून पराभव केला. आज या स्पर्धेत न्यूझीलंड – कॅनडा, आयर्लंड – झिम्बाब्वे आणि स्कॉटलंड – नेपाळ हे सामने होणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं येत्या रविवारी कवी अरुण कुलकर्णी काव्य पुरस्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. ज्येष्ठ कवी श्रीधर नांदेडकर यांनी ही माहिती दिली. ईश्वरपूरचे कवी एकनाथ पाटील यांच्या 'अरिष्टकाळाचे भयसूचन' या कवितासंग्रहाला हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. ११ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या ना. गो. नांदापूरकर सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

****